**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
**नवमहाराष्ट्र युवा अभियान व**
**रयत शिक्षण संस्थेचे एस. एम. जोशी कॉलेज,**
**हडपसर, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

यशवंत
शब्दगौरव
महाविद्यालयीन
वक्तृत्व स्पर्धा
२०१९

दि. २५ जून २०१९

प्रति,
मा. ____________________

____________________

महोदय,

सप्रेम नमस्कार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने मागील अनेक वर्षांपासून राज्यभरात युवक-युवतीसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांसह विविध महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आपणास वेळोवेळी मिळतो. विद्यार्थ्यांमध्ये विविध कलागुण विकसीत होऊन, व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणीस पोषक वातावरण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. सदर प्रयत्नाचा एक भाग म्हणून 'यशवंत शब्दगौरव आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धे'चे आयोजन करण्यात आलेले आहे.

वक्ता दशसहस्रेषु असे म्हणतात. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी वक्तृत्व कला आवश्यक आहे. त्यासाठीच अधिकाधिक वक्ते निर्माण होऊन, विविध विषयांवर सखोल वाचन आणि विचार मंथन होऊन सद्विचारांचा ओघ अखंड रहावा ही अपेक्षा या माध्यमातून आहे.

कृपया आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करून ही शब्द पंढरीची वारी यशस्वी करण्यास सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद!

आपले स्नेहांकित,

प्रा. डॉ. अरविंद बुरुंगुले
प्राचार्य
एस. एम. जोशी कॉलेज,
हडपसर, पुणे

नीलेश राऊत
राज्य संघटक,
नवमहाराष्ट्र युवा अभियान,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## पुणे विभागीय फेरी : (पुणे, सोलापूर व अहमदनगर जिल्हा)

**मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०१९, सकाळी १० वा.**

**स्थळ : रयत शिक्षण संस्थेचे एस. एम. जोशी कॉलेज, माळवाडी, हडपसर, पुणे –२८**

**नाव नोंदणीची अंतिम तारीख : गुरुवार, २२ ऑगस्ट २०१९ (प्रवेश मर्यादित)**

अधिक माहितीसाठी संपर्क :
**डॉ. अमित नागरे – ८६०५२१००५२, डॉ. प्रभांजन चव्हाण – ९५२७१९२७१५, डॉ. पांडूरंग भोसले – ९४२३२५५०३८**